# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे — ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :— ''महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत व नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनांसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करणेसाठीच्या मुदत वाढीबाबत...''**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मा. शिक्षण सहसंचालनालय (उच्च शिक्षण), पुणे विभाग यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र.महाडीबीटी २०२४—२५/शिष्यवृत्ती शाखा/८११३, दि. ०८/११/२०२४ अन्वये पुढील प्रमाणे कळविले आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जांची पडताळणी महाविद्यालय स्तरावरून करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, दि. ०५/११/२०२४ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार पुणे विभागांतर्गत महाविद्यालय, विद्यापीठ व संस्था स्तरावर सन २०२०—२१, सन २०२१—२२, सन २०२२—२३ व सन २०२३—२४ मधील पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित आहेत असे कळविले आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरून रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरून तात्काळ पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची गांर्भीयनि नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता महाविद्यालयाने ऑनलाईन ॲप्लिकेशन स्कृटिनी करून मंजूरीस्तव पाठविले आहेत. प्राप्त अर्जांवर विभागीय स्तरावरून स्कृटिनी करताना जे ऑनलाईन ॲप्लिकेशन रिव्हर्ट करण्यात आले आहेत. सदर ऑनलाईन ॲप्लिकेशनचे रिव्हर्ट करण्यात आल्याचे कारण/रिमार्क्स वाचून सदर त्रुटीची पूर्तता करून नंतरचे सदर ऑनलाईन ॲप्लिकेशन मंजुरीस्तव पाठवावेत. तसेच महाविद्यालयाने ऑनलाईन ॲप्लिकेशन सोबत आवश्यक योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता न करता ऑनलाईन ॲप्लिकेशन मंजूरीस्तव पाठवू नये. याची सर्व महाविद्यालयांनी कृपया गांभीर्याने दक्षता घ्यावी.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करण्यात येत आहे. सदरहू योजनांचे सन २०२४—२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक १५/११/२०२४ रोजीपर्यंत आहे.

महाडीबीटी पोर्टल आणि एनएसपी पोर्टलवरील सर्व प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज सदर मुदतीमध्ये सर्व स्तरावरून स्कृटिनी झालेल्या विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती जमा करण्यात येईल. तसेच पडताळणी करिता प्रलंबित राहिलेल्या शिष्यवृत्ती अर्जांवरून उद्‌भवणाऱ्या प्रश्नास संबंधित महाविद्यालयाचे/परिसंस्थाचे मा. प्राचार्य/संचालक जबाबदार राहतील अशा सूचना मा. शिक्षण सहसंचालक, यांनी दिलेल्या आहेत.

तरी याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय/संस्था स्तरावर एकाही विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीसाठीचा अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

11/11/2024

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

गणेशखिंड पुणे — ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/३६६० }
दिनांक : ११/११/२०२४ }

सोबत :

मा. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे दि. ०८/११/२०२४ रोजीचे पत्र.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

11/11/2024 on email

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी २०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/ 6993 दिनांक : ०८.११.२०२४

**तात्काळ / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत व नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनांसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करणेसाठीच्या मुदत वाढीबाबत..**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य/डीबीटी/एनएसपी/६६५१९२ दि. ०७.११.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जांची पडताळणी महाविद्यालय स्तरावरुन करणेबाबत वेळोवेळी परिपत्रकाद्वारे तसेच सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच व्हॉट्सॅप वर जिल्हानिहाय गृपमध्ये वारंवार सूचनाद्वारे कळविण्यात येत आहे. तरीही **दि. ०५.११.२०२४ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार पुणे विभागांतर्गत महाविद्यालय, विद्यापीठ व संस्था स्तरावर सन २०२०-२१, सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४** मधील पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्र. अर्जांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
| १ | पुणे | ९१ | ११६ | १८४ | ५१८ | ७६४१ | ५०१ | ५०२ | ८५६ | २२४० |

महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरुन तात्काळ पडताळणी करणे आवश्यक आहे. सोबत महाविद्यालयनिहाय यादी जोडण्यात आली आहे. यादीमध्ये नमूद एकही ऑनलाईन ऍप्लिकेशन महाविद्यालय स्तरावर प्रलंबित ठेवू नये. ज्या महाविद्यालयांचे ऑनलाईन ऍप्लिकेशन जास्त प्रमाणात (ऑनलाईन ॲप्लिकेशन संख्या २०-१००) प्रलंबित आहेत. तसेच ज्यांची प्रलंबित ऑनलाईन ॲप्लिकेशन १-२० असतील त्या सर्व महाविद्यालयांनी तात्काळ आजच्या आजच सर्व स्कृटिनी पूर्ण करावी.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता महाविद्यालयाने ऑनलाईन ऍप्लिकेशन स्कृटिनी करुन मंजूरीस्तव पाठविले आहेत. प्राप्त अर्जांवर विभागीय स्तरावरुन स्कृटिनी करताना जे ऑनलाईन ॲप्लिकेशन रिव्हर्ट करण्यात आले आहेत, त्या ऑनलाईन ऍप्लिकेशनचे रिव्हर्ट करण्यात आल्याचे कारण / रिमार्क्स वाचून सदर त्रुटीची पूर्तता करुन नंतरचे सदर ऑनलाईन ऍप्लिकेशन मंजूरीस्तव पाठवा. कृपया कोणत्याही महाविद्यालयाने ऑनलाईन ऍप्लिकेशन सोबत आवश्यक योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता न करता ऑनलाईन ऍप्लिकेशन मंजूरीस्तव पाठवू नये. याची सर्व महाविद्यालयांनी कृपया गांभीर्याने दक्षता घ्यावी.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करण्यात येत आहे. सदरहू योजनांचे सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक १५.११.२०२४ रोजीपर्यंत आहे.

**NSP पोर्टलवरील डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०२४-२५ महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या**

| SR. NO | SCHEME NAME | APPLICATION TYPE | TOTAL RECEIVED | FINAL VERIFIED | DEFECTIVE | REJECTED | PENDING AT INSTITUTE | PENDING AT DIST/STATE | TOTAL WITHDRAW |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | POST MATRIC SCHOLARSHIP FOR STUDENTS WITH DISABILITIES (QUOTA 1879) | FRESH | 556 | 295 | 10 | 1 | 123 | 127 | 0 |
| | | RENEWAL | 379 | 233 | 9 | 00 | 51 | 86 | 22 |
| | | TOTAL | 935 | 528 | 19 | 01 | 174 | 213 | 22 |
| 2 | CENTRAL SECTOR SCHOLARSHIP SCHEME (QUOTA 7417) | FRESH | 3799 | 1657 | 67 | 17 | 760 | 977 | 0 |
| | | RENEWAL | 8816 | 5551 | 137 | 11 | 1292 | 1759 | 0 |
| | | TOTAL | 12615 | 7208 | 204 | 28 | 2052 | 2736 | 0 |

महाडीबीटी पोर्टल आणि एनएसपी पोर्टलवरील सर्व प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज सदर मुदतीमध्ये सर्व स्तरावरुन स्क्रुटिनी झालेल्या विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती जमा करण्यात येईल. तसेच पडताळणी प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्‌भवणाऱ्या प्रश्नास संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव/ महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. **कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय, संस्था, विद्यापीठाच्या स्तरावर एकाही विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.